# इथिओपिया आणि सुदान

## चन्द्रशेखर पुरन्दरे

**इथिओपिया**

पूर्व आफ्रिकेतील इथिओपिया हा लोकसंख्येने आफ्रिकेतील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. देशात अनेक जनजाती [नव्वदहून जास्त.आहेत आणि त्यांचे केंद्र सरकारशी सतत संघर्ष चालू असतात.] देशाच्या उत्तरेकडे टेग्रे नावाचे राज्य आहे. तेथील लोकांना टेगरीन म्हणतात. लोकसंख्येने टेगरीन एकूण देशाच्या लोकसंख्येच्या सहा टक्के आहेत. पण १९९१ ते २०१८ पर्यंत ते देशाच्या कामकाजात निर्णायक भूमिकेत होते. त्यामुळे संख्येने जास्त असणाऱ्या इतर जमातींमध्ये असंतोष होता. त्यातील एक – ओरोमो. २०१८ च्या निवडणुकांत या जमातीचा नेता अबे अहमद पंतप्रधान झाला. त्याने टेगरीनचे सत्तेतील वर्चस्व कमी केले. त्या निर्णयाची प्रतिक्रिया टेग्रे प्रांतात लगेच उमटली.Tigray People's Liberation Front [TPLF] व केंद्र सरकार यांच्यात युद्ध, युद्धविराम व पुन्हा युद्ध चालू आहे. ['आंदोलन', जानेवारी २१ मध्ये या प्रश्नाचा सविस्तर आढावा घेतला आहे.]

आता या युद्धाला एक वर्ष होत आहे. इथिओपियन सरकारने त्या प्रदेशातील इंटरनेट बंद केले आहे, बाहेरच्या कोणत्याही वृत्तसंस्थेला तेथे जाता येत नाही. त्यामुळे यादरम्यान किती बळी पडले आहेत आणि पडत आहेत, याचे केवळ अंदाज आहेत. TPLF ही आतंकवादी संघटना आहे असे इथिओपियन सरकारने जाहीर केले आहे. संयुक्त राष्ट्रसंघ, आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था या प्रदेशाला जीवनावश्यक वस्तूंचा, औषधांचा पुरवठा करण्याचा प्रयत्न करतात, पण तो सुरळीत होऊ शकत नाही. त्यामुळे एका अंदाजानुसार तेथे आज ४ लाख भूकबळी पडण्याची गंभीर शक्यता आहे. वीस लाख विस्थापित झाले आहेत. विशेष म्हणजे, अबे अहमदला शेजारच्या एरित्रिया देशाबरोबरचे दीर्घकालीन युद्ध समेटाने मिटवल्याबद्दल २०१९ चा शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला होता. त्याचे अलिकडचे उद्गार म्हणजे – या टेगरीन प्रश्नाला इथिओपिया कायमचा गाडून टाकेल व आपल्या पूर्वीच्या सुवर्णयुगात जाईल. [या भूमिकेचे प्रतिध्वनी आपल्याकडेही उमटत असतात.] अशा हटवादाची परिणती अखेर इथिओपियाच्या विभाजनात होऊ शकते. निरनिराळ्या जमाती निरनिराळी स्वायत्त राष्ट्रे होऊ शकतात.

आजवर आफ्रिका या अशांत खंडात इथिओपिया स्थिर व पश्चिमेला अनुकूल देश होता. युद्ध सुरू झाल्यावर युद्धखोरी करणाऱ्या दोन्ही बाजूंना पश्चिमेने शस्त्रे पुरवली. त्याअभावी हे युद्ध इतका काळ चाललेच नसते. [तोच प्रकार आधीच्या इथिओपिया-एरित्रिया युद्धात झाला होता.] पण आता इथिओपिया पश्चिमेच्या मर्जीतून उतरला आहे आणि दोन्ही बाजूंनी युद्ध थांबवावे असा आग्रह चालू झाला आहे. या बदललेल्या धोरणाचे प्रमुख, किंवा एकमेव कारण म्हणजे, देशातील अशांततेने दोनच वर्षांपूर्वी नक्की वाटणाऱ्या व्यापारी व गुंतवणुकीच्या मोठ्या संधी अचानक संपुष्टात आल्या.पाश्चात्य आंतरराष्ट्रीय कंपन्या आता तेथे जायला धजावत नाहीत. आर्थिक नाकेबंदीने युद्ध थांबेल हा होरा मात्र चुकला आहे.पश्चिम निदान म्हणायला तरी मानवी हक्कांचा उद्घोष करते. पण पश्चिमेकडून हवी ती मदत मिळणे कठीण आहे हे लक्षात आल्यावर आता इथिओपिया रशिया, चीन, इराण, तुर्कस्तान यांच्याकडे शस्त्रास्त्रे व आर्थिक मदतीसाठी वळत आहे. व्यापारी संधी मिळणे त्या देशांना मानवी हक्कांच्या उल्लंघनपेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. या देशांचे अंतर्गत स्वरूप पहाता त्यांना जेथे त्यांच्या स्वत:च्या नागरिकांच्या मानवी हक्कांची पर्वा नाही, तेथे इथिओपिया, टेग्रे तर दूरच. या देशांच्या इथिओपियातील प्रवेशाने हिंसाचार वाढण्याची व राजकीय समीकरणे अधिक गुंतगुंतीची होण्याची शक्यता आहे. शिवाय या प्रश्नाला अबेची वैयक्तिक सत्तालालासा हाही पैलू आहे. त्यामुळे टेग्रे प्रांतीयांबरोबर वाटाघाटी करण्यापेक्षा स्वत:ची सत्ता टिकवण्यासाठी तो युद्ध हा पर्याय स्वीकारत आहे.

या रस्सीखेचीत नेहेमीप्रमाणे गरीब व निराधार लाखात बळी जात आहेत. युद्धामुळे कित्येक हजार इथिओपियन्स

शेजारच्या सुदानला निर्वासित म्हणून गेले, काही काळाने सुदानने हे आगमन थांबवण्यासाठी ती सीमाच बंद केली. मग लोकांच्या वेदनेत भर पडली. निवासस्थान युद्धग्रस्त त्यामुळे तेथे जीवाची शाश्वती नाही तर त्यापासून दूर जाण्याचे मार्गही बंद. बृहत्जगाची उदासीनता व त्यातून येणारी निष्क्रियता, नोबेल पुरस्काराची घाई व निरर्थकता, आंतरराष्ट्रीय मानवी हक्क या संकल्पनेचा पश्चिमेचा राजकीय वापर, इत्यादि परत एकदा अधोरेखित झाले आहेत.

**सुदान**

या २५ ऑक्टोबरला सुदानमध्ये लष्कराने पंतप्रधानापासून अनेक राजकीय नेत्यांना स्थानबद्ध केले व सत्ता हातात घेतली. देशातील अर्वाचीन अस्थिरतेत व हिंसाचारात भर पडली.

अलीकडच्या घडामोडी पहाता २००३ पासून सुदानच्या दारफ्यूर नावाच्या पश्चिमेकडच्या प्रांतात मोठे हत्याकांड सुरू झाले. दारफ्यूर हे विसाव्या शतकातील आजवरच्या भयानक हत्याकांडातील एक. यात एकूण अडीच ते चार लाख लोकांची कत्तल झाली तर २० लाख विस्थापित झाले. त्यात स्त्रियांवरील अत्याचार अनन्वित होते. उत्तर सुदानच्या अखत्यारीतील लष्कराने व त्यांनी चिथावणी दिलेल्या झांजावीड नावाच्या आक्रमकांनी हे अत्याचार केले. स्त्रियांवर बलात्कार हे युद्धाचे शस्त्र झाले. अशा स्त्रीचा पाय तोडणे, तिला विद्रूप करणे असे प्रकार मोठ्या प्रमाणात झाले जेणेकरून उर्वरित समाजाला तिच्यावर बलात्कार झाला आहे हे कळेल. कमीजास्त तीव्रतेने हा संघर्ष आजवर चालूच आहे.

त्याबरोबरच उत्तर सुदान व दक्षिण सुदान यांच्यातील आधीचे वैमनस्य वाढत राहिले. त्याला अनेक कारणे होती. स्थिर जमिनीवर शेती करणाऱ्या जमाती आणि पशुपालनासाठी सतत नव्या कुरणांच्या शोधत फिरणाऱ्या भटक्या जमाती यांच्यातील जमीन व पाणी यातील वाद हे एक कारण. त्याला धार्मिक रंगही आला. उत्तर सुदान मुख्यत: मुस्लिम, राजवटही मुस्लिम तर दक्षिण सुदान खिश्चन किंवा आदिम जमातींचा. त्यात त्यांच्या अंतर्गत भिन्न जमातींच्या परस्पर वैराची भर पडली. वर्णद्वेषही होता. उत्तर सुदानमध्ये उजळ रंगाचे अरब तर दक्षिणेत कृष्णवर्णीय.

शेवटी उत्तर व दक्षिण सुदानमधील तणाव विकोपाला जाऊन दक्षिण सुदान २०११ साली वेगळा देश झाला.

दारफ्यूरची आंतरराष्ट्रीय दखल घेतली गेली.

राजकीय पटलावर २०१९ पर्यंत सुदानवर जवळजवळ तीस वर्षे ओमर अल बशीरची हुकूमशाही होती. म्हणजे दारफ्यूरचे हत्याकांड त्याच्या कारकीर्दीत झाले. त्यासाठी आंतरराष्ट्रीय कोर्टाने त्याच्यावर २००९ ला पहिले व २०१० ला दुसरे समन्स बजावले. सुदानने समन्स नाकारली. विशेष म्हणजे, त्यानंतरही बशीर अध्यक्ष म्हणून निवडून आला. लोकशाहीची हुकूमशाहीला ही मान्यता लक्षात घेतली पाहिजे. एवढेच नव्हे तर अनेक देशांना त्याने अधिकृत अध्यक्ष म्हणून भेटीही दिल्या. आंतरराष्ट्रीय कोर्टाच्या समन्सनंतर यातल्या पहिल्या देशानेच त्याला अटक करणे अपेक्षित होते. पण कोणत्याच देशाने ते केले नाही. आंतरराष्ट्रीय सत्ताकारण आंतरराष्ट्रीय कोर्टाला किती किंमत देते हेही लक्षणीय आहे.

दरम्यान महागाईने त्रस्त सुदानी जनतेचे मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक निषेध सुरू झाले. नंतर लष्करी उठावाने २०१९ ला त्याची सत्ता उलथण्यात आली. एवढ्यावर देशाचे दुर्दैव संपले नाही. बशीर पदच्युत झाल्यावर म्यानमारप्रमाणे लष्कर आणि नागरी नेतृत्व यांनी एकत्र येऊन सरकार स्थापन केले. हे सरकार ३९ महिने चालणार होते. त्यानुसार लष्कर व नागरी नेतृत्व आलटून पालटून काही काळ सत्तेवर रहातील असे ठरले. पण या संयुक्त सरकारमध्ये म्यानमारसारखेच संघर्ष सुरू झाले. दोन्ही पक्ष दुसरा पक्ष आपल्या कार्यकक्षेवर अतिक्रमण करत आहे असा आरोप करू लागले. मुळात बशीरची राजवट संपवण्यात सामान्य माणसाचा महागाईविरुद्ध उद्रेक हे प्रमुख कारण होते. पण एक सुसंबद्ध संस्था म्हणून लष्कराने या असंतोषाचा फायदा घेतला आणि सत्ता काबीज केली. म्हणजे, सत्तांतर्गत अंतर्विरोध सुरुवातीपासूनच होता. तो आता उघड झाला आहे.

लष्कराने सर्वंकष सत्ता आता हाती घेण्याचे प्रमुख कारण म्यानमारसारखेच आहे. नागरी सरकार रुजले तर आपण केलेल्या गैरव्यवहारांची चौकशी सुरू होईल व ती महागात पडेल हे लष्कराच्या वरिष्ठ नेत्यांना माहीत आहे. त्यापेक्षा बशीरला कोर्टाच्या हवाली करणे हा स्वस्त पर्याय २०२०

**(पान ३६ वर)**

Marathi-Monthly - Andolan Shashwat Vikasasathi, Editor-Medha Patkar. Postal Regn. No. MCE/296/2021-23
RNI No. MAHMAR/2009/30128 Licence to Post without Prepayment No. MR/Tech WPP/East/358/2021-23
Date of Publication 1st of every month Date of Posting 1st of every month Posted at Dadar P.O. 400014.

**(जगभर : पान १९ वरून)**




ला स्वीकारण्यात आला.

सुदानचे एकूण चित्र पहाता अनेक संकेत दिसतात. जमीन आणि पाणी या नैसर्गिक संसाधनांवर हक्क कोणाचा, जमातींचे व धार्मिक वितुष्ट, देशाच्या राजकारणातील लष्कराचा हस्तक्षेप, हुकूमशाही शाबूत ठेवण्यासाठी लोकशाहीचा वापर, आंतरराष्ट्रीय कायद्याची अक्षमता, या सगळ्याचा बळी म्हणजे समाजातील सगळ्यात असहाय्य गट विशेषत: स्त्रिया. यातील काही संकेत आपल्यालाही लागू आहेत.

*[ २१ नोव्हेंबरला आंतरराष्ट्रीय दडपणाखाली लष्कराने सत्ता परत निर्वाचित सरकारकडे दिली. हे हस्तांतरण किती काळ टिकेल ते पहावे लागेल. ]*

purandarearts.com
art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk

'शाश्वत विकास न्यास'च्या मालकीचा 'आंदोलन-शाश्वत विकासासाठी'चा हा अंक संपादक, मुद्रक, प्रकाशक मेधा पाटकर यांनी 'श्री गुरुकृपा प्रिंटर्स' १२१, अलाइड इंडस्ट्रियल इस्टेट, राम पंजवानी मार्ग, माहिम, मुंबई ४०००१६ येथे छापून दादर, मुंबई येथून प्रकाशित केला.
**प्रेषक : द्वारा केमिकल मजदूर सभा, २९-३०, पहिला मजला, 'ए' विंग, हाजी हबीब बिल्डींग, नायगाव क्रॉस रोड, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४.**

To,